"आषाढस्य प्रथम दिवसे ...." ह्या कालीदासाच्या "मेघदूत" ह्या प्रसिध्द काव्यातील ओळींनी आषाढ शुध्द प्रतिपदेला अनेक वर्षे पत्राची सुरवात करणारे, भीमसेन जोशींच्या अनेक सुमधुर ध्वनीफितीं ऐकुन रममाण होणारे, वर्तमानपत्र, कादंबऱ्या, कथा, प्रवासवर्णने, दिवाळी अंक ह्याचे वेळ मिळेल तेव्हा सतत वाचन करणारे, दररोज न चुकता योगासने, प्राणायाम व सूर्यनमस्कार करणारे, अतिशय मनोभावे व प्रसन्न अंतःकरणाने देवपूजा करणारे, "हमलोग", "बुनियाद", "रामायण", "महाभारत", "महाश्वेता" "घरकुल" अशा मराठी-हिंदीतील दूरचित्रवाहिनीवरील निवडक मालिका पाहणारे, "बॅरिस्टर", "घरात फुलला पारीजात", "प्रेमा तुझ्या गावा जावे" इ. नाटके आवुर्जुन नाट्यगृहात जाऊन पाहणारे आणि १९५३-१९९३ म्हणजे जवळपास ४० वर्षे पिंपळगांव बसवंत येथे वैद्यकीय व्यवसायाच्या माध्यमातुन रूग्णसेवेत रममाण होणारे करारी, कर्तव्यदक्ष व सर्जनशील व्यक्तीमत्व लाभलेले आमचे बाबांना गुरूवार दि २५।०९।२०१४ रोजी देवाज्ञा झाली, आणि भराभर एकापाठोपाठ अनेक आठवणींचा पट डोळ्यासमोर येऊन गेला. माझ्यासाठी ते माझे गुरू, दिशादर्शक, मार्गदर्शक आणि त्यामुळेच ते माझे श्रध्दास्थान. त्यांच्याविषयीच्या आठवणी लिहून काढाव्यात असे मनोमन वाटले त्यामुळेच हा एक प्रयत्न. लिखाण अर्थातच हजारो आठवणींनी गर्दी केल्यामुळे कितपत मुद्देसुद व प्रभावीपणे मांडता येईल हे सांगता येत नाही. त्यांच्याबद्दलच्या कुठल्या आठवणी प्रथम मांडू ह्याबद्दल मनात प्रचंड गोंधळ आहे. लिखाण भरकटण्याचीच शक्यता अधिक. त्यांच्या वैद्यकीय व्यवसायाविषयी आधी लिहू की साहित्यप्रेमाविषयी की संगीत प्रेमाविषयी आधी लिहु? फार विचार न करता मला जसे सुचेल तसे लिहितो. माझा जन्म झाला तेव्हा ते ३९ वर्षांचे होते व मला साधारणतः १९७१-७२ पासुनचे म्हणजे माझ्या मुंजीपासुनचे आठवते तेच मी लिहणार आहे.

मुंजीपासुनच सुरवात करतो. धेरा करावा लागल्याने मी पूर्णपणे नाराज होतो. कुठलाही विधी गुरूजी सांगितील त्याप्रमाणे करायला तयार नव्हतो. एकाही नातेवाईकाकडून (आजी, मामी, मावशी, आत्या, आई, काकु इ.) कडून जेवणातला घास घेण्यास तयार नव्हतो. सर्व फोटोत मी रूसलेलाच. अनेकांनी समजावलं. अखेर बाबांनी माझ्या दोन्ही खांद्यांवर हात ठेवुन मला समजावलं. त्यांच्या नजरेत विनंतीपण होती आणिं म्हणाल तर ऑर्डरपण. एका क्षणात मी माझा रूसवा दूर केला आणि घास घेण्यास सुरवात केली.

त्यांच्या अनेक आठवणी आहेत, त्यातील अनेक पिंपळगांवच्या. खेडेगावात त्या काळी दूरचित्रवाणी संच नसायचे. हे संच साधारणतः ८३-८४ च्या आसपास तेथे पोहचले. त्यामुळे घरोघरी रेडीओ हेच मुख्य माहितीचे व मनोरंजनाचे साधन. सकाळी ७.०० वाजता संस्कृतमधील बातम्या आजही आठवतात. बाबांना संस्कृत भाषेचे चांगलेच ज्ञान होते, त्यामुळे ते आम्हाला अर्थ सांगत. शाळेत ८,९ वी व १० वीला संस्कृत होते. अनेकवेळा पुस्तकातील संस्कृत सुभाषितांचा, संस्कृत व्याकरणाविषयी ते अतिशय सुंदर पण सोप्या भाषेत अर्थ सांगायचे.

संस्कृत बातम्यानंतर सकाळी ७.०५ मिनिटांनी "आकाशवाणी, पुणे, सुधा नरवणे प्रादेशीक बातम्या देत आहे" हा आवाज अजुनही कानांत असाच्या तसा आहे. ८।। ला वडील रेडीओवरील नाट्यसंगीत जरूर ऐकायचे. "धेई छंद..मकरंद", "गुलजार नार ही मधुबाला" इ. त्यांच्यामुळेच नकळत आम्हालाही ती पाठ झालेली. तसेच त्याकाळी रेडीओवरपण सिरीअलस् असायच्या. "पुन्हा प्रंपच" ही त्यातलीच. बाबा, आई, बहीणी, भाऊ आणि मी आम्ही सर्वजण ते ऐकायचो. मी तसा वयाने लहान, त्यामुळे सगळंच समजायचे नाही, त्यामुळे इतर सर्वजण हसले की मीही हसायचा. जवळपास रोज रात्री जेवण वगैरे झाल्यावर प्रभा अत्रे, किशोरी आमोणकर, वसंतराव देशपांडे, परवीन सुलताना, भीमसेन जोशी, D.V. पलुसकर, पं जसराज, सवाई गंधर्व (बाल, छोटा, मोठा, कुमार सगळेच) यांच्या ध्वनीफिती बाबा लावायचे. नक्की सांगता येणार नाही पण 'यमन कल्याण', 'मारू बिहाग', 'बागेश्री', 'मालकंस' इ. रागांवर आधारीत सुमधुर आवाजातील ख्याल, द्रुत आम्हा सर्वांना पाठ होती. गणपती (गणेश चतुर्थी) व घटस्थापनेला, लक्ष्मीपूजनाच्या दिवशी बिस्मिल्लांची सनई हमखास बाबा लावणारच. त्या सुरेल सनईने, पुण्यातील "विठ्ठलदास सुगंधी" यांची "धनश्री" उदबत्ती व "दामोदरदास सुगंधी" ह्यांच्याकडील अष्टगंधाने सर्व वातावरण कसे प्रसन्न असे. प्रत्येकजण उत्साहात असे. आजही मी घटस्थापना करतो, पण ती प्रसन्नता व उत्साह काही औरच. पिंपळगांवला त्याकाळी स्वाध्याय मंडळातर्फे प्रभातफेरी असे. बाबा मला व माझ्या भावाला त्यासाठी घेऊन जात. पूर्णगावात आम्ही २०-२५ मंडळी फेरी मारता मारता "स्वाध्यायींच्या साथी एकच योगेश्वर भगवान", "वन्दे वन्दे क मंडलम्" इ. म्हणत म्हणत फेरी पूर्ण व्हायची. फेरीला नियतांना, विशेषतः हिवाळ्यात थंडीमुळे व पावसाळ्यात चिखलामुळे नको वाटायचे. पण बाबांविषयी आदरयुक्त भीती एवढी की नाही म्हणण्याचे धाडस होत नसे. ते काहीच म्हणायचे नाहीत, कदाचित "मी नाही येणार" असे म्हटले असते तरी त्यांनी आग्रह केला नसता किंवा ते रागावलेही नसते. पण त्यांचं व्यक्तिमत्वच तसं होत की आम्ही नकार देण्याचा प्रश्नच नव्हता. अर्थात एकदा फेरी सुरू झाली की मजा वाटायची. इ. ८, ९ वीत असतांना विठ्ठल मंदिरामध्ये योगासन वर्ग सुरु झाले होते. त्यासाठीपण वडील मला आणि भावाला घेऊन जायचे. कंटाळा यायचा पण पहिली २-३ योगासने करून झाली की छान तरतरी यायची. सर्वात आवडीचे आसनं अर्थातच 'शवासन', कारण सांगायची गरज नाही.

उन्हाळ्यात व शरद ऋतुमध्ये ग्रह, तारे बघण्यासाठी आम्ही सर्वजण रात्री जेवण केल्यानंतर आमच्या शाळेच्या पटांगणावर जायचो. मग बाबा आम्हाला गुरू, मंगळ, इ. ग्रह व तारे दाखवायचे. आम्ही सर्व भावंडे त्याला "गुरू पाहणे" असं म्हणायचो. आकाशातील "गुरू" दाखविणारे बाबा आम्हा सर्वांचे आयुष्यभर "गुरू" होते.

नाशिकला गो. ह. देशपांडे ~~वक्तृत्व स्पर्धा~~ वक्तृत्व स्पर्धा आजही होत असत.
वीत असतांना त्यात मी ज्युनियरांच्या भाग घेतला होता १९७८ साली. फारसा प्रभाव
ाडु शकलो नाही. घरी आल्यावर पडका चेहरा बघुन बाबांनी मला समजावले.
अरे ही तर सुरुवात आहे. पुढच्यावर्षी चांगली तयारी कर" असे उत्तेजन दिले.
९ वी मध्ये त्याप्रमाणे मी प्रथम "साधना" वक्तृत्व स्पर्धेत भाग घेऊन पहिला
नंबर मिळवला. त्याचे श्रेय माझे शिक्षक व शाळेचे मुख्याध्यापक नाध सरांना व
बाबांना. विषय होता मला आवडलेली कविता. नाध सरांनी शाळेत शिकवलेली
"तुझ श्यामय सखे, भाट सकाळी चालवती, तरु तीरिचे ---" ही चंद्रशेखर ह्यांची कविता
मी निवडली. मोठी बहिण सौ. वर्षाला, अनारसे सर व बाबांना भाषण म्हणून दाखविले.
बहिणीने व सरांनी दुरुस्त्या सुचविल्या आणि बाबांनी फक्त "छान" ऐवढेच म्हटले.
त्यांनी छान म्हटल्यावर स्वारी एकदम जोरात. रविवार कारंज्यावरच्या "जैन हॉल" मध्ये
मी अतिशय विश्वासाने भाषण ठोकले व शाळेसाठी ढाल व व्यक्तीक प्रथम क्रमांक
मिळवला. वर्षाने अभिनंदन केले पण "साधना ही फक्त ग्रामीण भागांतील विद्यार्थ्यांसाठी
स्पर्धा आहे, गो. ह. देशपांडे मध्ये बक्षिस मिळवून दाखव" असे आव्हानपण दिले.
मी पण ते स्वीकारले पण "उत्तेजनार्थ" ऐवढेच बक्षिस मिळाले. पुढच्यावर्षी अजुन
तयारी करेन असा मी चंग बांधला. दहावीत पुन्हा भाग घेतला. "मला आवडलेले पुस्तक"
हा विषय निवडला. ४-५ पुस्तके जी वाचलेली व आवडलेली होती त्यावर भाषण
तयार केले, पण मनासारखे जमेना. खूप निराश झालो. स्पर्धेचा दिवस जवळ आला होता.
काही सुचेना. शेवटी बाबांना विचारले. त्यांनी मला तळेकर वकीलांकडे जाऊन मागच्या
महिन्याचा "सोबत"-चा अंक आणण्यासाठी पाठविले. मी मनोमन फारच चकित झालो
आणि रागावलोही. मी बाबांकडे भाषणासाठी म्हणुन विचारायला गेलो आणि त्यांनी
नेहमीप्रमाणे मासिक आणण्यासाठी धाडले. मासिक घेऊन आल्यावर त्यांनी ते चाळला
आणि त्यातील दुर्गा भागवतांचे "बलुतं" हे दया पवार ह्यांनी लिहलेल्या पुस्तकावरचे
परिक्षण मला वाचायले दिले. त्याआधी अतिशय थोडक्यात, मला समजेल अशा भाषेत
त्यांनी पुस्तकाविषयी मला ५-१० मिनिटांत सांगितले. मी तो लेख वाचला आणि
बाबांनी १० मिनिटांत सांगितलेला गोषवारा ह्यावरुन भाषण बनविले, त्यांना दाखविले.
बाबा म्हणाले "चांगल आहे, तुला पुस्तक बरचसे समजले आहे पण भाषणांत जास्तीत
जास्त वाक्य ही दुर्गाबाईंची आहेत. भाषण हे नेहमी स्वतःच्या शब्दांमध्ये
असायला हव. शब्द स्वतःचे असले की भाषण पाठ करावे लागत नाही. आणि
मग भाषण श्रोत्यांच्या थेट काळजात जाते." मी भाषण नंतर माझ्या शब्दात, मला जेवढे
कळले त्याप्रमाणे लिहीले, स्पर्धेत भाषण करुन टाळ्या मिळवल्या व शाळेसाठी ढाल
व प्रथम क्रमांकाचे बक्षिसही. ढाल मिळवण्यात माझे मित्र राजु भांबर व कमलेश शहा
ह्यांचेपण योगदान होते. (कमलेश ह्या जगात नाही).

ह्या सर्व यशांचे मानकरी कोण दुर्गाबाई की बाबा.?

आठवणी पिंपळगांवच्याच जास्ती, त्यामुळे तिथल्या घराविषयी थोडेसे लिहणारच. आम्ही मेनरोडवरच्या म्हसोबा चौकातल्या चाळीतील दोन खोल्यांच्या भाड्याच्या घरात राहात होतो. बाबांचा दवाखानाही चाळीतच तळमजल्यावर. दोन्हीही खोल्यामध्ये प्लायवुडचे पार्टीशन करून एका खोलीत "किचन" तर दुसऱ्यात "बाथरूम". दोन्ही खोल्यांना मिळून छोटीशी पण सलग "बाल्कनी". सर्व मिळून अंदाजे 350-400 sq. ft घरात माणसे सहा. त्यामानाने दवाखानाच थोडासा मोठा पण त्यातही बऱ्याच भागावर घरातील वस्तूंचे (धान्यांसाठीच्या कोठ्या, सोफा, पाहुणे आल्यास जास्तीच्या गाद्या वगैरे) अतिक्रमण. घरात प्रवेश करतानाच लागणारी पहिली खोली म्हणजे आमचा दिवाणखाना कम क्रिकेटचे ग्राऊंड कम संगीत मैफिलींचा हॉल कम बेडरूम. त्यापुढची खोली म्हणजे बेडरूम कम देवघर कम "जे काही काम असेल ते". त्याकाळी साधारणतः सर्व मध्यमवर्गीय कुटुंबांची घरे अशीच असत. त्यात अनेक अडचणी. पाणी जेमतेम, लांब नळावरून आणायचे, वीजेचा नेहमीच तुटवडा, प्रचंड धूळ व भररस्त्यावर घर असल्याने प्रचंड गोंगाट इ. असे असले तरी प्रसन्न, आनंदी व उत्साही मने व निरोगी शरीरे ह्यामुळे आम्हा सर्वांसाठीच ते वास्तव्य अतिशय आनंद देऊन गेले. सर्व नातेवाईक नेहमी यायचे. खूप मजा यायची. ह्या टीचभर जागेतही अनेकवेळा गावांतील उत्साही व संगीतप्रेमी मंडळी घरी यायची व संगीत मैफीलींचे आयोजन व्हायचे. त्यासाठी बाबांनी काही सतरंज्या, गालीचे व पेटी व तबला खरेदी केलेली. मोठी बहिणी सौ. रेवती गायक, तबल्यावर व्हराळेसाहेब, पेटीवर कुणीतरी. मैफीलीच्या मध्यंतरात आई छानपैकी कॉफी सगळ्यांसाठी बनवित असे. मैफीलीची सांगता व्हराळे साहेब "माणसाचा माणूस वैरी" किंवा "याद पियांकी आये" ह्या पदांनी करत. अशा मैफीली इतर मंडळींच्या घरीपण होत असत.

बाबांचे रोजचे रूटीनपण खूप ठरलेले. सकाळी ५.४५ वा. उठणे, योगासने, प्राणायाम, सूर्यनमस्कार साधारणतः तासभर, त्यानंतर आंघोळ व ८.30 वा. न्याहरी. रोज त्यांना वेगळं हवं असायचं. त्याप्रमाणे मग आई पोहे, उपमा, सांजा, शिरा, थालीपीठ, घिरडी, तिखटमीठाच्या पुऱ्या इ. सर्वांसाठीच तयार व्हायची. बरोबर ९.०० वाजता दवाखाना ते उघडायचे. त्याआधी स्वतःच तो झाडून पुसून साफ करायचे. दुपारी १.०० वाजता किंवा शेवटला रूग्ण तपासल्यानंतर बंद करून जेवणासाठी घरी यायचे. जेवण त्यांना अतिशय शांतपणे, आरामात व शक्यतो २/3 जणांबरोबर गप्पा-टप्पा करत करत हवे असायचे. जेवणानंतर महाराष्ट्र टाईम्स मधील अग्रलेख, 'धावते जग', 'आयफेल टॉवर' आदी सदरांचे वाचन व नंतर २५-30 मिनिटांची वामकुक्षी. त्यानंतर दुपारचा चहा व लगेच दवाखान्यात रात्री ८.30 - ९.०० पर्यंत. घरी परत आल्यावर प्रथम घड्याळाला चावी देणे, भोजन, असेल तर फलाहार, थोड्या गप्पा व मग शास्त्रीय संगीत ऐकत ऐकत झोप. रविवारी आठवड्याचा बाजार असल्याने ह्या रूटीन मध्ये थोडा बदल व्हायचा. सकाळी ते जेवण करूनच जायचे व चहासाठी दु. ४ ला यायचे व मग रात्री ९ ला परत.

शनिवारी दुपारनंतर अर्धा दिवस सुटी घेत. शनिवारी जेवण व थोडा विश्रांती घेऊन
शनिवारी दुपारनंतर अर्धा दिवस सुटी घेत. शनिवारी जेवण व थोडी विश्रांती
एस्. टी. ने नाशिकला यायचे. माई-दादांना-काकांना भेटायचं, आईने काही सांगितलेली कामे,
आदर्श बेकरीमधुन 'मकुन', 'नानकटई', 'टोस्ट', 'मिल्कब्रेड', 'खारी' इ. ची खरेदी
(हिवाळ्यात च्यवनप्राश व तोहीन) करून संध्याकाळी ६.30 पर्यंत दसककर यांच्याकडे
गाण्याच्या क्लासला ९ पर्यंत हजेरी लावुन ९.30 वा. च्या नाशिक-नांदगांव गाडीने
रात्री १०.30 पर्यंत घरी परत येत. दवाखान्यात रिकामा वेळ मिळाला की विविध
साहित्याचे वाचन (दिवाळीत 'माणूस', 'सोबत', 'किर्लोस्कर', 'स्त्री', 'मनोहर' इ.
दर्जेदार अंकांचे वाचन), आवश्यक औषधयोजना, साफसफाई इ. उपक्रम असत.
त्याकाळी "फॅमिली डॉक्टर" संकल्पना असल्याने रूग्ण तपासणीसाठी त्यांच्या घरी जावुन लागायचे.
गावांत आणि नजीकच्या खेड्यांमध्ये मग ते सायकलवरून जात असत. रात्रीच्यावेळी
रूग्णांचे नातेवाईक मोटरसायकल, बैलगाडी, ट्रॅक्टर, जीप घेऊन यायचे.

गावांतील काही मंडळी संध्याकाळी दवाखान्यात कुणी नसल्यास गप्पा मारण्यासाठी येत.
शेती असणारे द्राक्षांचा वानवळा देत. बाबा अनेक गरीब रूग्णांना कमी फी किंवा मोफत
उपचार करत असत.

असे हे त्यांचे रूटीन वर्षभर अनेक वर्षे सुरू होते. ह्यामध्ये वर्षातुन काही सुट्या
असत. एक रंगपंचमीच्या दिवशी व दुसरी डिसेंबर/जाने मधील गुरूवार, शुक्रवार
व शनिवारी ते पुण्याला "सवाई गंधर्व" ह्या कार्यक्रमासाठी पुण्याला जात तेव्हा.
तेव्हा "टायफाईड" किंवा "कॉलरा" ह्या रोगांसाठी वर्षातुन एकदा इंजेक्शन प्रत्येकाला
घ्यावे लागे. रंगपंचमीला सकाळचा दवाखाना आटोपल्यावर ते डॉ. गुजराथींकडून हे इंजेक्शन
घ्यायचे. त्यामुळे किंचित ताप यायचा त्यामुळे दुपारनंतर ते विश्रांती घेत असत.

साहित्य व संगीत हे बाबांचे अतिशय प्रिय. "सवाई गंधर्व" कार्यक्रम तर त्यांचा वीकपॉइन्ट्च.
त्यासाठी ते गुरूवारी सकाळी दवाखाना करून रात्रीपर्यंत पुण्याला पोहचत. त्याकाळी हा कार्यक्रम
संपूर्ण रात्रभर 3 दिवस "खजिनाविहीरी" जवळ होत असे. रात्रभर मैफीलीचा आनंद घेऊन
सारसबागेजवळच राहणारे आमचे नातेवाईक कै. भाऊजी रानडे यांच्याकडे यायचे. ४-५ तासांची
झोप, संध्याकाळी त्यांच्याशी गप्पा, पुण्यातील काही कामे व इतर नातेवाईक इ. ना भेटुन पुन्हा
रात्री कार्यक्रमाला हजर. शनिवारी तेच रूटीन, मात्र शनिवारी रात्री २.30-3.00 वाजताच ते
शिवाजीनगरला येऊन पेपर टॅक्सीने निघुन रविवारी १० पर्यंत दवाखान्यात हजर होत असत.
रविवारी रात्री घरी आल्यावर संगीताचा आनंद पण भीमसेन जोशींना रविवारी दवाखाना असल्याने
ऐकु न शकल्याबद्दलची खंत असे. पुढे २-3 दिवस मग ह्या कार्यक्रमाविषयीच ते आमच्याशी बोलत
व मित्रांना लिहिलेल्या पत्रात पण त्याचे वर्णन असे.

बाबांच्या रोजच्या रूटीनमधे काही फरक पण झाले. आम्हा भावांच्या मुंजीनंतर
घराण्यात चालत आलेले कुलाचार, कुळधर्म, देव व त्यांची नित्यपूजा आमच्याकडे सुरू
झाली. माई व दादांकडून सर्व कुलाचार, कुळधर्म आई-बाबांनी समजावून घेतले.
एका टिपणवहित बाबांनी ते सर्व लिहून ठेवलेले आहेत.

बाबा आता नित्यपूजा करायला लागले. हळूहळू पूजेला लागणारा अवधी वाढत गेला. अर्धा तासापासून त्यांना पाऊण तास ते १ तास देवपूजेसाठी त्यांना लागत असे. आंघोळीनंतर सोवळे नेसुन पिवळे अष्टगंध लावून ते पूजेला सुरवात करीत. पूजेची सर्व तयारी (उपकरणे आणि नैवेद्य) आई करून ठेवत असे. पूजेसाठी सुरवातीला ते पाट वापरायचे. त्यानंतर चटई, बस्कर व नंतर खास पुण्याच्या मंडईत मिळणारे दर्भासन ते वापरायचे. दादांच्या दुकानातील सुवासिक अत्तरे असतं. पूजेदरम्यान अथर्वशीर्ष, श्रीसुक्त, व्यंकटेश स्तोत्र ते म्हणत असतं. स्पष्ट शब्दोच्चार व लयबध्द पध्दतीने ते म्हणत असतं. व्यंकटेश स्तोत्र तर फारच मला आवडायचे. रोजचे रोज ऐकुन ते पाठच झाले होते. त्यातील "गवीचे होते लेंडगोळे....", "धाव पाव रे गोविंदा....", "कागविष्टेची पिंपळ....", "द्रोपदीस देई वस्त्रे अनंत....", "कुबेर तुझा भांडारी...." हे सर्व प्रथम ऐकतां हसायला यायचं, बाबांनी अर्थ समजुन सांगितल्यावर जास्त मजा येत असे. सर्व पूजा अतिशय मनोभावे, एका शिस्तीत, प्रसन्नतेने ते करायचे. नुसतं ते सर्व सोपस्कार बघायलाही मोठी मजा वाटायची. गणेश चतुर्थी व घटस्थापनेला तर महापूजा होत असे. गणपती व देवीला अभिषेक पात्राद्वारे अभिषेक असायचा. आमचे नाशिकचे दक्षित गुरुजींच्या ध्वनीफितीद्वारे ती पूजा होत असे. डिसेंबरमध्ये खंडोबाची तळी भरण्याचा विधी असे. या व्यतिरिक्त हौस म्हणून आई चैत्रगौर चैत्रात व श्रावणात जिवतीची पूजा करत असे. चैत्रात, व श्रावणात हळदीकुंकवाचा उपक्रम असे. दिवाळीत धनत्रयोदशीला धन्वंतरीची व लक्ष्मीपूजनाला लक्ष्मी-कुबेराची पूजा होत असे. भाऊबीजेला श्रीमामा, मामी व शैलेश आमचेकडे यायचे. भाऊ मामा औरंगाबादला असल्याने न चुकता मनीऑर्डर पाठवित असे. बाबासुध्दा न चुकता आपल्या चारही बहिणींना मनीआर्डर करत असतं. बारळी पोर्णिमेला आत्या घरी यायच्या. बाकी अनेक छोटे मोठे सण (पोळा, नागपंचमी, रथसप्तमी, वटपोर्णिमा, रामनवमी, संक्रांत, हनुमानजयंती, गोपाळकाला, कोजागिरी, होळी इ.) मोठ्या उत्साहाने साजरी होत असे. शेवटी सर्व उत्सव, सण हे आपल्या आनंदासाठी, समाधानासाठीच असतात. बदलत्या काळाप्रमाणे हे सर्व आता इतिहासजमाच झाले आहे.

आवश्यकतेनुसार सर्व वस्तू (रेडीओ, टेप, कुकर, गॅस, मिक्सर, वॉशिंग मशीन, TV) आमच्या घरात हळूहळू आल्या. मोटरसायकल, कार, टेलीफोन, फ्रिज इ. मात्र नाही. आम्ही बाबांच्या पाठी लागायचो तेव्हा ते म्हणायचे, टेलीफोनची आपल्याला गरज नाही, फ्रिजची गरज फक्त मुंबईकरांना, एस्.टी. ची एवढी चांगली सोय असतांना कारची गरजच काय? आणि जरी घेतली तरी ठेवू कुठे? इ.

१५ ऑगष्ट व २६ जानेवारीला बाबा शाळेमध्ये झेंडावंदनासाठी आवर्जुन यायचे. भाऊ स्काऊटमध्ये व मी NCC मध्ये. आमची परेड असायची. बाबांना तिथे बघुन छान वाटायचे. आम्ही सर्व भावंडे शाळा व कॉलेजमध्ये विविध स्पर्धांमध्ये भाग घ्यायचो. वक्तृत्व, एकांकीका, नाटक, निबंध, एकपात्री प्रयोग, गायन आदी स्पर्धांमध्ये आमचा सहभाग असे. सौ. रेवतीची "चांदणे शिंपीत जा", सौ. वर्षाची "घेतलं शिंगावर"

आणि माझी "काका किश्याचा" ह्या नाटकांतील भूमिका आजही आठवतात. शामनेपण एका नाटकांत प्रमुख भूमिका केलेली (नांव आठवत नाही) पण मी पुण्याला शिकायला असल्याने बघता आली नाही. एवढचं कशाला आईनेपण गावांतील महिला मंडळातर्फे आयोजीत केलेल्या एका नाटकात काम केले होते. ह्या सर्व कार्यक्रमांना आम्ही सर्वजण जात होतो. पिंपळगांवच्या के. के. वाघ कॉलेजमधील प्रा. मुंगी (ते आता नुकतेच वारले) एकाहून एक सुंदर सांस्कृतिक कार्यक्रम घडवून आणत. स्नेहसंम्मेलनातील पारितोषिक वितरणासाठी अनेक मोठी माणसांना ते निमंत्रित करायचे. प्रायोगीक रंगभूमीच्या प्रचार व प्रसारासाठी शिबीरे होत असतं. त्यासाठी दिनानाथ टाकळकर, भालबा केळकर आदि मान्यवर गावांत १०-१५ दिवस असायचे. आमचे बाबांनापण खास अशा कार्यक्रमांना निमंत्रण असे. ते ही आवर्जुन हजर असायचे.

बाबांचा नियमीत पत्र लिहण्याचा तर छंदच होता. महिन्याला किमान १-२ पत्रे त्यांच्या सुवाच्च अक्षरात असायची. त्यांच्या लिखाणातला प्रत्येक शब्द वाचणाऱ्याशी जणु बोलायचाच. पत्र साधारणतः त्यांच्या मित्रांना (डॉ. वि. म. शिंदे, रत्नागिरी, डॉ. नेने देवगड, डॉ. बर्वे नांदगांव) किंवा त्यांचे शिक्षक भाऊराव आगाशे व नातेवाईक त्यांना असायची. पत्र लिहून झाल्यावर घरातील सर्वांना ते दाखवून मग ते टपालपेटीत टाकत. तसेच कुणाचही पत्रं आलं की तेही सगळ्यांना वाचायला दिले जाई. पत्रामध्ये कादंबरी, नाटकं, प्रवासवर्णन, टाइम्स मधील, मासिकामधील लेखांविषयींबस्चे त्यांचे मत, गायक, मैफीली किंवा दवाखान्यातील एखादा गमतीदार प्रसंग इ. असतं. माई आजी गेल्यानंतर भाऊराव आगाशे यांना लिहलेले पत्र आजपण माझ्या लक्षात आहे. स्वतःच्या आई बद्दलच्या भावना अतिशय प्रभावीपणे त्यात त्यांनी मांडलेल्या होत्या. तिच्या पश्चात वडीलांची काळजीपण पत्रात व्यक्त झाली होती.

हल्ली रेडीओ, T.V. वर अनेक तज्ञ आजच्या शिक्षणांत "व्यवहार शिक्षण" नसल्यामुळे खंत व्यक्त करतात. त्यामुळे मुलांना बँकेचे चेक्स, ड्राफ्ट, पोष्टाची मनीऑर्डर इ. ची माहिती नसते. त्यामुळेच असे शिक्षण मुलांना पालकांनीच शिकवायला हवे असे मत मांडत असतात. बाबांनी हे सर्व शिक्षण/अनुभव आम्हा सर्व भावंडांना दिले. बँकेत पैसे भरणे, चेक्स भरणे, ड्राफ्ट काढणे, Regd post, Regd A.D, मनीऑर्डर, बँक FDR, बँक पुस्तक भरून आणणे इ. सर्व कामे करायला शिकवली. आम्हाला ते सर्व करण्याचा कंटाळा असायचा, पण त्यांनी काम सांगितले की नाही म्हणण्याची सोय नसे. पण त्यातुनच आम्ही तयार झालो. मी पुण्याला शिकायला गेल्यावर बाबा व दादा (आजोबा) ह्या दोघांचीही मी पुण्यातील काम करत असे. होस्टेलवर त्या दोघांचीही पत्रे येत. बाबांचे Inland व दादांचे post Card. बाबा पत्रात सर्व खुषाली कळवत, आवश्यक तेवढाच उपदेश असे. "येतांना अळुरकर म्युझिक हॉऊस मधून अमुक-अमुक ध्वनीफित, किंवा मंडईतुन "दर्भसिन" किंवा फडके हौदावरून "धनश्री" उदबत्ती आणावी किंवा चितळे बंधू आंबावडी" असे फर्मान असायचे.
दादांचे पोष्टकार्ड "पुण्याहून येतांना पिवळे अष्टगंध व हिरवा धागा उदबत्ती व क्वचित

केळकर बंधू क्रोबा नं. 360 चे अत्तर [illegible] आणावे. बील नको. पैसे आल्यावर देईन इ." कालीवेळा काही वेगळ्या वस्तू (दुर्मिळ पुस्तके/ग्रंथ इ.) ची पण खरेदी करण्यास ते सांगत. वस्तूचे वर्णन व पत्ता पत्रामध्ये अचूक दिलेला असे. मीपण हौसेने सर्व वस्तू पत्ते (ते सदाशिव/नारायण/शनिवार पेठेतले) शोधुन घेऊन यायचो. दादांचे सर्व सप्लायरसबरोबरचे संबंध खूपच छान होते. त्यांचा व्यवहारपण चोख होता. त्यामुळे मी गेल्यावर सर्व दुकानदार आदबीने माझ्याशी बोलत. त्यांची, बाबांची चौकशी करीत.

बाबांचे डाकुमेनटेशन तर भन्नाट होते. प्रत्येक बँकेचे पासबुक असतानाही त्यासाठी खास स्वतःच्या वहीत त्याचा तपशील असे. कंपनी शेअर्स, वीमा पॉलीसी इ. ची सर्व माहिती त्यांनी ठेवलेली असायची. वर्षभराचे Macrolevel व महिना व आठवड्याचे Microlevel Planning त्यांचेजवळ असायचे. ह्या शिवाय सर्व नातेवाईक मित्रपरिवार ह्यांचे पूर्ण पत्ते (पीनकोड, दूरध्वनी सकट) लाल रंगाच्या डायरीमध्ये सुवाच्च अक्षरात लिहलेले होते. आमच्या साने घराण्यातील आधीच्या ५-६ पीढ्यांमधील लोकांची नांवे त्यात होती. डायरी सदैव त्यांच्याजवळच्या बॅगमध्ये असे. अर्थातच आम्हा सर्वांना पत्ते बघण्यासाठी ती लागत असे. डायरी बघितल्यावर लगेच जागेवर ठेवली पाहिजे हा नियम. आम्हाला ते जमणे अवघडच, त्यामुळे डायरी आमच्या हातात मिळत नसे. (मला नेहमी अमिताभच्या डॉन चित्रपटातील लाल डायरी व आमच्या बाबांची लाल डायरी, जरी डॉनच्या लाल डायरीतील मजकुर पूर्णपणे वेगळा असला तरी, ह्यात साम्य वाटायचे.

बाबांचे जे मी रूटीन लिहले आहे, ते अनेकवर्षे तसेच चालू असायचे. आम्हाला प्रश्न पडायचा की ह्याचा त्यांना कंटाळा कसा येत नाही? खरोखर त्यात ते कधी कंटाळलेले वाटले नाही, दिसले नाही. माझ्यामते जरी रूटीन Fix असले तरी दिवसभरातील प्रत्येक Activity मध्ये सूक्ष्म बदल ते करत असत. जरी योगासने रोज करायचे तरी रोज वेगवेगळी आसने ते करायचे, देवपूजा रोजचीच पण दररोज वेगवेगळी स्तोत्र, आरत्या असायच्या, दवाखान्याचे वेळापत्रक जरी ठरलेले व येणारे रूग्ण चीडचीडे, रोगाने ग्रासलेले त्रासलेले, तरी बाबा प्रसन्न असत, कारण आपल्या पेहरावात ते विविधता ठेवत, कधी फुलशर्ट, तर कधी हाफ, तर कधी टी शर्टस्, कधी सफारी तर कधी कोट. डोक्यावर विविधरंगी टोप्या सुध्दा वापरायचे. वाचन आणि लेखन जरी रोजचेच तरी लेखक, साहित्यप्रकार, पत्रांचे विषय वेगवेगळे. ह्या जाणिवपूर्वक विविधतेने रूटीनचा कंटाळा न येऊ देता जवळपास ४० वर्षे प्रसन्नपणे व उत्साहाने रूग्णसेवा ते करू शकले असे वाटते.

मुळातच साहित्य व संगीतप्रेमी बाबांना पुण्याचे विशेष आकर्षण होते. दर्जेदार गोष्टींची आवड मग ते शिक्षण असो, सांस्कृतिक कार्यक्रम असो की विवाह समारंभ असो. आम्हा सर्वांची लग्नकार्ये पुण्यालाच व्हावीत ही त्यांची इच्छा, विशेषतः मुलींची (कारण ती मुलीच्या वडीलांवर अवलंबून असते). माझ्या दोन्ही बहिणींची व भावाची लग्ने पुण्यातच झाली. माझे जरी लग्न नाशकात झाले तरी माझ्या सासु-सासऱ्यांनी

ज्या उत्साहाने व आदरातिथ्याने सर्व सोहळा पार पाडला, त्यामुळे ...
अर्थात पुण्यात लग्न आयोजीत केल्याने गांवची सर्व मंडळी येणार नाही ह्याची त्यांना कल्पना होती. त्यामुळे मोठ्या मुलीचे लग्न झाल्यावर गावांत निदान रिसेप्शन करावे हे त्यांच्या डोक्यात होते, पण हे सर्व कसे करायचे हा मोठा प्रश्न होता. त्यांनी हा प्रश्न जेव्हा त्यांचे एक स्नेही रसिकलाल शहा ह्यांचेकडे मांडल्यावर त्यांना मोठे आश्चर्य वाटले. ते म्हणाले डॉक्टर चिंता करू नका, तुमच्या घरचे कार्य म्हणजे आमच्या घरातील कार्यासारखेच. माझी दोन्ही मुले, ३-४ पुतणे व आम्ही चार भाऊ सर्व व्यवस्था करू, तुम्ही फक्त काय पाहिजे ते सांगा. आणि खरोखरच सर्व व्यवस्था शहा कुटुंबीयांनी करून रिसेप्शनाचा कार्यक्रम पार पाडला.
इतकेच काय पण लग्नामध्ये काही मदत पाहिजे का? हेही विचारले होते. पण 'उद्यान' व 'कोहीनूर' ह्या पुण्यातल्या कार्यालयांची व्यवस्था एवढी चोख की आपण फक्त लग्नाला हजर राहण्याचीच काय ती आपली जबाबदारी. सौ. वर्षाच्या सासरपुढारी पुण्यात ।विश्राम गोगटे ह्यांचे घरी झाला. तिच्या लग्नासाठी आम्ही सर्व त्यांचे घरीच उतरलो होतो.

आजोबा वयाच्या ८९ वर्षी पिंपळगांवलाच असतांना देवाघरी गेले. त्याहीवेळी गावांतील सगळ्यांनीच मिळून अंत्यविधी पार पाडला होता.

बाबांनी कधी राजकारणात अनेक प्रलोभने असतानांही भाग घेतला नाही. ग्रामपंचायत, पतपेढी, बँका इ. मधील सदसत्वाचे त्यांना कधीही आकर्षण वाटले नाही. कुठल्याही राजकीय मंचावर ते बसले नाहित. गावांतील शेतजमीनी विकत घेण्याचे प्रस्ताव नेहमी येत, पण आपला तो पिंड नाही हे ओळखुन कधीही त्या भानगडीत पडले नाही. कधीकाळी आपलं स्वतःचे घर बांधता येईल म्हणून एक छोटसा प्लॉट त्यांनी घेतला होता, पण घर त्यांनी त्यावर बांधले नाही.

बालपणी संघशाखेत जे जात असत. तारूण्यामध्ये काही काळ संघाचा प्रचारक म्हणून काम केले व जेलची हवा पण खाल्ली. संघाच्या संस्कारांमुळेच त्यांच्यात प्रचंड शिस्त, नीटनेटकेपणा, भावुकता, देशप्रेम व सेवाभावी वृत्ती होती. आज जे प्रसारमाध्यमातुन संघाचे विचार, कार्य, तत्वज्ञान ह्याविषयी जे काही लिहले किंवा बोलले जाते ते मला फोल वाटते. कदाचित बाबांच्या मते संघाचे कार्य करण्यासाठी शाखेतच जायला पाहिजे, प्रचारकच होयला पाहिजे असे नसुन कुठलाही माणूस तो जे काम करतो ते सेवाभावी वृत्तीने, मनापासुन केल्यास देश घडत असतो. आपल्या वैद्यकीय व्यवसायाच्या माध्यमातुन त्यांनी हेच तत्वज्ञान आचरण्याचा प्रयत्न केला. अर्थातच आईच्या शांत, समाधानी व संयमी स्वभावामुळे मिळालेली जोड त्यामुळेच ते हे कार्य करू शकले.

माझ्या लग्नानंतर मोठ्या भावाकडे दवाखान्याचा कारभार सोपवून ते नाशिकला स्वतःने बांधलेल्या घरी वासवास आले. "आता मी मोकळा झालो आहे. आता मनमुरादपणे साहित्य, व्याख्याने, संगित ह्याचा आनंद घेणार आहे. आयुष्यभर व्यवसायानिमित्त कुठे जाता आले नाही, त्यामुळे पूर्ण भारतभर फिरणार आहे" असे त्यांनी सांगुन टाकले. मनसोक्त देवपूजा करणार व दासबोध, ज्ञानेश्वरी ह्यांचा अभ्यास करणार

पुढे १५-१८ वर्षे त्याप्रमाणे त्यांनी मोठ्या आनंदाने [illegible]
नाशिकच्या घरीही व्यायाम, देवपूजा (पुष्कर, तन्वी ह्यांना घेऊन) इ. चालूच होते. रोजच्या
कार्यक्रमपण ते ठरवत. परशुराम सायखेडकर, कालिदास, ज्योतीकलश
अशा अनेक ठिकाणी विविध विषयांवरची भाषणे, परिसंवाद ह्याला हजर
रहात. संगीत मैफीली होत्याच. शिवाय बँक, पोस्ट ह्यातील व्यवहार
घरातील इतर कामे, वीजबील, नळबील, घरपट्टी, शेतसारा इ. कामे वेळच्या
वेळी करत. T.V. वर आवडीचे कार्यक्रम बघणे इ. आनंदाने करीत होते.
७५ वय झाल्यावर रितसर मृत्युपत्रपण त्यांनी वकीलामार्फत तयार करून घेतले.
उन्हाळ्यात गच्ची व पहिल्या मजल्यावरील बाल्कनीत झोपणे, गच्चीपासुन
अंगणापर्यंत साफसफाई, नातेवाईक व मित्रांशी पत्रव्यवहार, नातवंडांबरोबर
खेळणे आदी सुरू असायचे. दरवर्षी 'गुरुनाथ ट्रॅव्हल्स' ह्या त्यांच्या
आवडीच्या कंपनीतर्फे दक्षिण भारत, सिमला-मनाली, पुर्व भारत इ. सहली
पण झाल्या. त्याआधी श्रीमामा आसामला असतांना तिथे व काश्मीर
सहल पण त्यांनी केल्या. सिमला ट्रीप मध्ये त्यांना ह्रदयविकाराचा झटका
आलेला, पण उत्तम तब्येत, सहलीतील पुण्याचे श्री. जोशी ह्यांनी वेळीच
पुरवलेली औषध व नशीब बलवत्तर — त्यामुळे त्यातुन सहीसलामत बाहेर
आले पण मग कुठल्या सहलीला मात्र गेले नाहीत. फक्त लग्नकार्याला, महत्वाच्या
समारंभांना व नातेवाईकांकडे 2-४ दिवस जाणे होत असे. सिमला ट्रीप अगोदर
आवडीच्या सवाई गंधर्व उत्सवास हजेरी लावुन भीमसेन जोशींचे गाणे
पुर्ण समाधानाने त्यांना ऐकायला मिळाले.

आम्ही वरचे मजल्यावर रहातो, त्यामुळे रोज वरचेवर चक्कर मारायचे. सौ. प्राचीला
वाचनाची आवड. तिच्याशी मग त्यावर चर्चा करत. तिला त्यांचा खूप आधार वाटे.
पुष्कर पण त्यांना खूपच Attach होता. तो कधी आजारी असला की ते अस्वस्थ होत. आई किंवा
* ह्यांना बरं नसलं की तो अस्वस्थ व्हायचा.
वयोमानाप्रमाणे शरीर तंदुरुस्त पण विस्मरणाचा त्रास सुरू झाला. त्यामुळे त्यांचे
सर्व व्यक्तीमत्वच बदलले. मरणापूर्वी 2-3 मासच अंथरूणाला होते.

त्यांच्याविना ही दिवाळी फारच सुनीसुनी वाटते. दिवाळी म्हणजे दिव्यांचा सण.
आयुष्यभर आपल्या आचरणाने, विचारांनी अखंड नंदादीपासारखे प्रकाशाची वाट
दाखविणारे आमचे बाबा आता फक्त हजारो आठवणींच्या माध्यमातुन आमच्याजवळ
आहेत. आजही त्यांचा प्रसन्न, उत्साही, आनंदी चेहरा डोळ्यासमोर आहे.

शाळेत NCC ला असतांना बुटाची लेस बांधून देणारे बाबा मला कधी रागावल्याचे आठवत
नाही, कुठल्याही गोष्टींविषयी अगदी करिअरबाबतही आग्रही नसायचे. नाशिकचे घर मोठे, त्यामुळे कायम
ते माणसांनी भरलेले असावे, नातेवाईकांनी नेहमी यावे, सर्वांनी मिळून गप्पा गोष्टी, जेवणं करावी
हीच त्यांची इच्छा असे. पुष्करच्या मुंजीत व नंतर "अभ्यंकर गेटटुगेदर" जेव्हा आम्ही नाशिकला केले
त्यावेळी ते फार खूष होते. आता कॉलेजमधून घरी परतले की आपोआप नजर त्यांच्या बेडरूमकडे वळते,
पण ते तिथे दिसत नाहीत, स्मरणात फक्त आनंददायी त्यांच्याबरोबरच्या आठवणी. — शिरीष